मराठी अस्मितेचा बुलंद आवाज.
https://www.vruttamanas.in/

किंमत : ३ रुपये
आर. एन. आय क्र. - ६५६०९/९६
Email : vrittamanas1@gmail. com

# वृत्तमानस

मुंबई/ पालघर वर्ष- २९ अंक - १०५ शनिवार, ५ ऑक्टोबर २०२४ पाने- ८

दैनिक "वृत्तमानस" साठी पाठविण्यात येणाऱ्या बातम्या आणि अन्य कार्यालयीन कामासाठी कृपया editorvm22@gmail.com या मेल वर पत्रव्यवहार करावा





नरेंद्र मोदी
प्रधानमंत्री

सत्यमेव जयते



एकनाथ शिंदे
मुख्यमंत्री

‘अभिजात’ सन्मान
‘मराठी’च्या घरा
तोचि दिवाळी-दसरा



मराठी
अभिजात दर्जा लाभला
अवघा महाराष्ट्र आनंदला

जाणल्या मराठी मनाच्या भावना

घटस्थापनेच्या मुहूर्तावरच, केंद्र शासनाने
मराठी भाषेला ‘अभिजात भाषा’ हा दर्जा देण्याचा निर्णय घेतला.
मराठी भाषेचा उचित गौरव, मराठी संस्कृतीचा हा सन्मान.
सातत्यपूर्ण पाठपुरावा, लोकसहभाग, मराठी माणसाच्या
तीव्र इच्छाशक्तीचा..हा झळाळता आनंद!

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी व केंद्र शासनाचे मन:पूर्वक आभार!



www.mahasamvad.in MaharashtraDGIPR MahaDGIPR

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन

डी.जी.आय.पी.आर/आरओसी/२०२४-२५/क्र.५/सी ३९६३

# वसई मतदारसंघावर आता ठाकरे शिवसेनेचा डोळा

## लोकसभेतील यशानंतर वसई लढवण्याचा मानस

## काँग्रेसच्या पारंपरिक गडात इच्छुकांचे टेन्शन वाढले

**प्रतिनिधी**

■ **वसई**

वसई विधानसभा मतदारसंघ हा सन १९९० च्या आधी काँग्रेसचा बालेकिल्ला होता. मात्र त्यानंतर या किल्ल्यात सलग ३०-३५ वर्ष बहुजन विकास आघाडीचे निशाण फडकत आहे. यंदाच्या लोकसभेत महाविकास आघाडीला या मतदारसंघात चांगली मते मिळाली, त्यादृष्टीने या मतदारसंघाचे सारथ्य काँग्रेस करणार असे ठरले असतानाच लोकसभेतील चांगल्या मताधिक्यामुळे या काँग्रेसच्या पारंपरिक गडात ठाकरे गट मशाल हाती घेऊन उतरण्याचा मानस व्यक्त करत असल्याचे राजकीय सुर उमटत आहेत.

वसई विधानसभा मतदार संघ बहुजन विकास आघाडी विरोधात शिवसेना लढवत होती. आता या मतदारसंघात काँग्रेस मोठ्या ताकदीने उतरण्याच्या तयारी असताना लोकसभेच्या मताधिक्यावरून येथे ठाकरे गट या मतदारसंघात उतरण्याच्या तयारीत असल्याची चर्चा आहे.

सध्या काँग्रेसकडून समीर वर्तक, विजय पाटील ही नावे चर्चेत आहेत. गेल्या वेळेस या मतदारसंघात शिवसेनेकडून विजय पाटील रणांगणात होते. मात्र त्यांचा पराभव झाला होता. आता पुन्हा काँग्रेसमध्ये गेलेल्या विजय पाटील यांचे नाव आघाडीवर आहे. मात्र वसई मतदारसंघ ठाकरे गट ही लढवण्याचा विचार करत असल्याने काँग्रेसमधील इच्छुकांचे टेन्शन वाढले आहे. जरी ठाकरे गटाने हा मतदारसंघ काबीज केलाच तर ठाकरे गट इथे कोणता चेहरा देणार? असा सवालही उपस्थित होत आहे.

# हाताने मैला उचलणाऱ्या सफाई कामगारांचे 6 ते 16 ऑक्टोबर या कालावधीत मुंबईत होणार सर्वेक्षण

**प्रतिनिधी**

■ **मुंबई**

मुंबई शहर आणि उपनगरांमध्ये डोक्यावर मैला वाहून नेणारे कामगार (मेहतर) चे सर्वेक्षण २०१३ मध्ये करण्यात आले होते. त्यावेळेस हाताने मैला उचलणाऱ्या सफाई कामगारांची एकही नोंद झाली नव्हती. असे असले तरीही, एका याचिकेच्या निमित्ताने केंद्रीय सामाजिक न्याय आणि अधिकारिता मंत्रालयाच्या निर्देशानुसार मुंबईत डोक्यावर मैला वाहून नेणारे कामगार (मेहतर) यांचे सर्वेक्षण ६ ऑक्टोबर २०२४ ते १६ ऑक्टोबर २०२४ या कालावधीत करण्यात येणार आहे. या सर्वेक्षण कालावधीत (शनिवार व रविवार वगळता) कार्यालयीन वेळेत (सकाळी १०.३० ते सायंकाळी ५.३०) विभाग कार्यालयातील सहायक मुख्य पर्यवेक्षक (घनकचरा व्यवस्थापन) यांच्याशी संपर्क साधावा किंवा भेट घ्यावी, असे आवाहन बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून करण्यात आले आहे. दरम्यान, या सर्वेक्षणाच्या निमित्ताने प्रचार आणि प्रसिद्धीसाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत विविध उपक्रम हाती घेण्यात आले आहेत.

केंद्र शासनाने हाताने मैला उचलणाऱ्या सफाई कामगारांच्या नियुक्तीस प्रतिबंध करणे व त्यांचे पुनर्वसन करणे अधिनियम २०१३ पारित केला आहे. या कायद्याची अंमलबजावणी ६ डिसेंबर २०१३ पासून करण्यात आलेली आहे. कायद्याच्या मार्गदर्शक तत्वानुसार मुंबई शहर आणि उपनगरांमध्ये डोक्यावर मैला वाहून नेणारे कामगार (मेहतर) यांचे सर्वेक्षण २०१३ मध्ये करण्यात आले होते. त्यावेळेस बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रात हाताने मैला उचलणाऱ्या एकाही सफाई कामगारांची नोंद झाली नव्हती.

हाताने मैला उचलणाऱ्या सफाई कामगारांच्या विषयाच्या निमित्ताने नुकतीच रिट याचिका दाखल करण्यात आली आहे. त्यामुळे केंद्र सरकारच्या सामाजिक न्याय आणि अधिकारिता विभागाचे सचिव यांनी सर्व महानगरपालिका, नगरपालिका, नगरपरिषदा यांना त्यांच्या कार्यक्षेत्रात हाताने मैला उचलणाऱ्या सफाई कामगारांचे सर्वेक्षण करण्याबाबत सूचित केले आहे. या निर्देशानुसार बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रात या सर्वेक्षणाला सुरूवात होणार आहे.

या सर्वेक्षणासाठी महानगरपालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागामार्फत एका त्रयस्थ संस्थेची नेमणूक करण्यात येणार आहे. तसेच पथनाट्याच्या माध्यमातूनही या कामगारांच्या विषयाची जनजागृती करण्यात येणार आहे. तसेच सर्वेक्षण अंतर्गत नाव नोंदवण्यासाठीची जाहीर सूचना प्रत्येक विभागातील शौचालय, सेक्शन चौकी, मोटर लोडर चौकी आदी ठिकाणी प्रसिद्ध करण्यात येणार आहेत.

# वसईत बदलत्या हवामानाचा कहर

## ताप आणि श्वसन विकारांनी रुग्णालये भरली

**प्रतिनिधी**

■ **वसई**

परतीच्या पावसानंतर आलेल्या हवामानातील बदलांमुळे वसईकरांचे आरोग्य धोक्यात आले आहे. दिवसाच्या वेळी असलेला प्रखर ऊन आणि रात्री येणारा थंडावा यामुळे अनेकांना ताप, सर्दी, आणि खोकल्याच्या साथीचे आजार जडू लागले आहेत. शहरातील खाजगी आणि सार्वजनिक रुग्णालयांत सध्या रुग्णांची मोठी गर्दी असून, व्हायरल ताप आणि श्वसन विकारांचे उपचार घेणाऱ्या रुग्णांची संख्या सतत वाढत आहे.

पावसाचा तडाखा संपल्यानंतर हवा दमट राहिली असून, या वातावरणामुळे अनेकांना घसा खवखवणे, डोळ्यांची जळजळ आणि श्वसनाचे त्रास जाणवत आहेत. खराब रस्त्यांमुळे आणि वाहनांच्या धुरामुळे धूलिकणांची पातळी वाढल्याने दम्याचे तसेच इतर श्वसनविकारांच्या रुग्णांचे हाल होत आहेत.त्यातच, थंडी वाजून ताप येणारे रुग्ण वाढले आहेत. या साथीच्या आजारांमुळे नागरिकांना कामातून आणि दैनंदिन जीवनातून त्रास होत आहे. बदलत्या हवामानामुळे या समस्यांना बळी पडणाऱ्या वसईकरांनी लवकरात लवकर वैद्यकीय सल्ला घेणे आवश्यक आहे.

या परिस्थितीत शहरातील सरकारी आणि खाजगी रुग्णालये रुग्णांनी भरली आहेत, तसेच अनेक रुग्णालयांत वेळ घेऊन सल्लामसलत घेणे गरजेचे आहे. अशा वातावरणात, अधिकाधिक नागरिकांनी मास्क वापरणे, पिण्याच्या पाण्याची योग्य काळजी घेणे आणि शक्यतो घरातच राहणे याबाबत सावधानता बाळगण्याची गरज आहे.

सार्वजनिक आरोग्य तज्ज्ञांनी नागरिकांना सर्दी-खोकल्यापासून वाचण्यासाठी वैयक्तिक स्वच्छता आणि संरक्षणाचे उपाय अवलंबण्याचा सल्ला दिला आहे. वातावरणातील बदलांमुळे आजार वाढत असल्याचे दिसत असून, नागरिकांनी आपले आरोग्य जपण्यासाठी अतिरिक्त काळजी घेणे महत्त्वाचे ठरत आहे.

# पालिका कामगार कर्मचाऱ्यांना 30 हजार रुपये सानुग्रह अनुदान देण्याची समन्वय समितीची मागणी, आयुक्त सकारात्मक - बाबा कदम



**प्रतिनिधी**

■ **मुंबई**

मुंबई महानगरपालिका कामगार कर्मचारी संघटना समन्वय समितीची शुक्रवारी आयुक्त भूषण गगराणी यांच्यासमवेत सानुग्रह अनुदानाबाबत (बोनस) बैठक पार पडली. सदर बैठकीत समन्वय समितीने महापालिका कामगार कर्मचारी अधिकारी वृंदाना प्रत्येकी रु. ३००००/- सानुग्रह अनुदान (बोनस) देण्याची मागणी केली.

सदर मागणीस आयुक्त भूषण गगराणी हे सकारात्मक असुन पुढील ३/४ दिवसात अर्थसंकल्पाच्या तरतुदीनुसार तसेच मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याशी चर्चा करून अंतिम निर्णय घेण्यात येईल असे त्यांनी सांगितले असल्याचे कामगार नेत्यांनी पत्रकारांना सांगितले.

मुंबई महानगरपालिकेतील कामगार, कर्मचारी अधिकारी, कार्यालयीन कर्मचारी, अधिकारी, अभियंते, तंत्रज्ञ, परिचारीका, परिसेविका, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, सुरक्षा रक्षक, अग्निशमन दलातील कर्मचारी इ. कायम कामगारांना सानुग्रह अनुदान (बोनस) देय आहे. त्याचबरोबर मुंबई महानगरपालिकेतील विविध खात्यातील कंत्राटी, रोजंदारी कामगार, बहुउद्देशीय कामगार, आरोग्य खात्यातील कंत्राटी कामगार, मुंबई जिल्हा क्षयरोग नियंत्रण संस्थेतील कर्मचारी यांनाही सानुग्रह अनुदान (बोनस) देण्याची मागणी करण्यात आली होती. सदर सर्व कंत्राटी कामगारांना मागील वर्षाप्रमाणे सानुग्रह अनुदान देण्यात येईल. असेही ठरवण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

सदर बैठकीत समन्वय समितीचे अध्यक्ष बाबा कदम, सत्यवान जावकर, अशोक जाधव, वामन कविस्कर, के. पी. नाईक, ॲड. प्रकाश देवदास, दिवाकर दळवी इ. मान्यवर विविध कामगार संघटनेचे नेते उपस्थित होते.

# रविवारी मालाड मीठ चौकीतील उड्डाणपुलाची एक मार्गिका व पालिका शालेय इमारतीचे लोकार्पण

**मुंबई:** मालाड (पश्चिम) येथील मीठ चौकी, जोड मार्गावरील उड्डाणपुलाची एक मार्गिका आणि नवीन बांधलेल्या मालवणी टाऊनशिप महानगरपालिका शालेय इमारतीचे लोकार्पण रविवारी दुपारी १२ वाजता केंद्रीय वाणिज्य व उद्योग मंत्री पीयूष गोयल यांच्या हस्ते करण्यात येणार आहे.

यावेळी मुंबई उपनगरे जिल्हा पालकमंत्री मंगल प्रभात लोढा, मुंबई शहर जिल्हा पालकमंत्री दीपक केसरकर, आमदार सुनील शिंदे, आमदार राजहंस सिंह, आमदार अस्लम शेख, आमदार योगेश सागर यांना निमंत्रित करण्यात आले आहे. महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक भूषण गगराणी, अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (पश्चिम उपनगरे) डॉ. विपिन शर्मा, अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (प्रकल्प) अभिजीत बांगर, सहआयुक्त (परिमंडळ ४) विश्वास शंकरवार, उप आयुक्त (पायाभूत सुविधा) उल्हास महाले, उप आयुक्त (शिक्षण) डॉ. (श्रीमती) प्राची जांभेकर, सहायक आयुक्त (पी उत्तर) किरण दिघावकर आदी मान्यवर देखील उपस्थित राहणार आहेत.

# मोखाड्यात किरकोळ वादातून दारूच्या नशेत मित्राने मित्राचीच केली हत्या

■ **मोखाडा**



किरकोळ वादातून दारूच्या नशेत मोखाड्यात २८वर्षीय तरुणाची हत्या झाल्याची घटना घडली या घटनेने मोखाडा शहरात एकच खळबळ निर्माण झाली असून पोलिसांनी मात्र तात्काळ आरोपीला अटक केली आहे.

दर्गाआळी येथे रहाणारे आरोपी वीरेंद्र उर्फ वीरू भोये वय १९वर्ष व मयत महेश मोरे वय २८वर्ष व सोबत मित्र असे तिघे जण दारू पिऊन आनंदवाडी येथून रस्त्याने चालत येत असताना महेश मोरे ह्याला दारू जास्त झाल्याने आरोपी वीरेंद्र भोये ह्याची सायकल फेकून दिली तसेच त्याला आई बहिणीवरून शिवीगाळी केल्याने आरोपी वीरेंद्र ह्याला राग अनावर झाल्याने महेश मोरे ह्याची बोथट हत्याराने डोक्यात वार करून खून केला सदरची घटना गुरुवारी रात्रीच्या १२:००वाजताच्या सुमारास घडली असून या घटनेचा अधिक तपास मोखाडा पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रेमनाथ ढोले करत आहेत.


**महत्त्वपूर्ण निवेदन**

वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीचा मजकूर स्वीकारण्यापूर्वी काळजी घेतली जात असली तरी त्याच्या आशयाची पडताळणी करणे शक्य होत नाही. तरी आपल्या वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील जाहिरातदार कंपन्या, सहयोगी संस्था अथवा व्यक्तीबरोबर व्यवहार केल्यामुळे कोणत्याही स्वरूपाचे नुकसान व हानी झाल्यास त्यासाठी अथवा संबंधित जाहिरातीतील आशयासाठी मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि.ला जबाबदार ठरविता येणार नाही. त्यामुळे जाहिरातदारांना कोणतीही रक्कम प्रेषित करण्यापूर्वी अथवा त्याच्याबरोबर कोणत्याही स्वरूपाचे संमतिपत्र कार्यसिद्ध करण्यापूर्वी अथवा एखाद्या जाहिरातीवर आधारित कोणतीही कृती करण्यापूर्वी वाचकांनी आवश्यकती चौकशी करण्याची खबरदारी घ्यावी.



**पब्लिक नोटीस**

याद्वारे नोटीस देण्यात येते की, गांव मौजे विरार प., ता. वसई, जि. पालघर येथील शक्ती कॉम्प्लेक्स को-ऑप. हौ. सो. लि. या इमारतीमधील फलॅट नं. २०५, दुसरा मजला, बी/विंग असा फलॅट सौ. सोनाली दिनेश मोरे यांनी सौ. पुजा राजकुमार निषाव यांचेकडून दिनांक ३०/०७/२०२४ रोजीच्या रजिस्टर कराराने कायमचा विकत घेतलेला आहे, तरी सदर फलॅटवर अगर त्याचे एखादया भागावर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा वारसा हक्क, हिस्सा, दावा असल्यास त्यांनी तो निम्नस्वाक्षरीकारांना त्यांच्या १११, कपाडीया हाऊस, गावठण रोड, विरार प. येथील कार्यालयात ही नोटीस प्रसिध्द झालेच्या तारखेपासून १४ दिवसाचें आंत कळवावा, तसे न केल्यास तशा प्रकारचा कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क, हितसबंध नाही असे समजून किंवा कोणाचा असल्यास तो सोडून देण्यात आला आहे असे समजण्यात येईल.
कळावे.

आपला विश्वासू
आर. टी. पाठक
वकील

दिनांक- 01/10/2024



**जाहीर नोटीस**

या नोटीसीद्वारे तमाम जनतेस कळविण्यात येते की, माझे अशिल श्री. नितीन जगन्नाथ ठाकुर पत्ता -दरपाळे वडवली, नायगांव प., ता. वसई जि. पालघर हे श्री. केसरीनाथ नामदेव कोळी व इतर रा. नायगांव कोळीवाडा, नायगांव प. यांच्याकडून त्यांचे मालकीची व कब्जे वहिवाटीची खालील नमुद जमीन मिळकत विकत घेत आहेत व श्री. केसरीनाथ नामदेव कोळी व इतर यांनी सदर जमिन मिळकत विकत देण्यास मान्य व कबुल केले आहे. सदर जमीन मिळकतचे वर्णन खालीलप्रमाणे आहे:

गांव मौजे उसगांय, तलाठी सजा पारोळ ता. वसई, येथील स.नं.९९/अ/१ क्षेत्र:-२.००.०० हे. आर. चौ. मी. आकार ५.४० रु.पै. उपअधिक्षक भुमिअभिलेख वसई यांचे अधिकार क्षेत्रातील वसई विरार शहर महानगर पालिकाचे हद्दीतील सह दुय्यम निबंधक वसई-६ यांच्या कार्यक्षेत्रातील जमिन मिळकत.

तरी सदर मिळकतीवर कोणत्याही इसमाचा अथवा संस्थेचा बोजा, हक्क, अधिकार, हितसंबध, दावा, गहाण, दान, वारसा, साठेकरार, तारणगहाण व अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबध असल्यास त्यांनी खालील पत्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १४ दिवसांचे आत कागदपत्रासह लेखी पुराव्यासहीत हरकत घ्यावी अन्याथा न घेतल्यास आपण आपला हक्क सोडलेला आहे असे गृहित धरून पुढील व्यवहार पुर्ण केले जाईल याची नोंद घ्यावी.

सही
**ॲड. रमजान अली मलिक**
**पत्ता : १५, संस्कृती बिल्डींग, जी. जी. कॉलेज जवळ,**
**कोर्ट रोड, वसई प. ता. वसई जि. पालघर, पि. नं. ४०१२०१**
**मो. नं. ८३६९१८३६२०**



**महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ**
(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

**मुदतवाढ सूचना**

**ई निविदा सूचना क्र.३२ /२०२४-२०२५ (मुंबई) करीता**

दिनांक ०२/०९/२०२४ रोजी दैनिक नवाकाळ, मुंबई, दैनिक मिड डे, मुंबई, दैनिक वृत्तमानस, मुंबई या वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध झालेल्या वरील ई निविदा सूचनेतील खालील कामाकरीता ई निविदा महामंडळाच्या संकेतस्थळावर उपलब्धतेबाबत मुदतवाढ सूचना देण्यात येत आहे.

| अ.क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम रुपये |
|---|---|---|
| १ | टिटिसी औद्योगिक क्षेत्रातील भूमिगत सांडपाणी वाहिनीची देखभाल व दुरूस्ती.... टिटिसी औद्योगिक क्षेत्रातील सी व डी ब्लॉकमधील सांडपाणी वाहिनीची वर्ष २०२४-२६ (२ वर्षा करीता) वार्षिक तत्वावर देखभाल व दुरूस्ती करणे. | ₹ १,४८,५८,७५९.०० |

उपरोक्त कामांकरीता निविदा प्रपत्र दिनांक ०७/१०/२०२४पर्यंत महामंडळाच्या http://www.midcindia.org या संकेत स्थळावर उपलब्ध असतील.

ज्या निविदाधारकांनी यापूर्वी आपली निविदा भरली असेल अथवा अपलोड केली असेल, त्यांनी निविदेमध्ये बदल करुन किंवा बदल न करता सदर निविदा पुन्हा भरणे आवश्यक आहे, याची कृपया नोंद घ्यावी, अशा कंत्राटदारांनी शुद्धिपत्रकानंतर जर निविदा पुन्हा भरली नाही अथवा अपलोड केली नाही तर त्यांचा देकार सदर स्पर्धात्मक निविदेतून आपोआप बाद होईल.

सदर निविदा सूचनेत इतर कोणताही बदल करण्यात आलेला नाही.

जा.क्र./का.अ.(मुख्या)/ P-326514 /२०२४



**पालघर नगरपरिषद, पालघर**

**जाहीर ई निविदा सूचना - (प्रथम मुदतवाढ)**

पालघर नगपरिषद पाणीपुरवठा विभागाकरिता दि.२६/०९/२०२४ रोजी दै. सकाळ, दै. परशुराम समाचार व दै. द इंडीयन एक्सप्रेस, या वृत्तपत्रात जाहीर ई - निविदा सुचना प्रसिद्धी देऊन www.mahatenders.gov.in या संकेत स्थळावरुन ऑनलाईन पध्दतीने मागविण्यात आल्या होत्या. परंतु विहित मुदतीत दि. ०३/१०/२०२४ रोजी पर्यत योग्य तो प्रतिसाद न लाभल्याने सदर निविदा प्रक्रीयेस दि. ०८/१०/२०२४ रोजी पर्यंत प्रथम मुदतवाढ देण्यात येत आहे. याची नोंद घ्यावी.
जावक क्र. पानप/कार्या/६५२८/२०२४-२०२५
दि.०४/१०/२०२४

सही/-
प्रशासक
पालघर नगरपरिषद



**बृहन्मुंबई महानगरपालिका**

**स्वारस्य अभिव्यक्ती**

पी/दक्षिण विभागातील फेरिवाला अतिक्रमण निर्मुलनाकरिता अशासकीय संस्थेमार्फत सेवा पुरविण्याकरीता बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील अशासकीय संस्थांकडून मोहरबंद स्वारस्य अभिव्यक्ती अर्ज मागविण्यात येत आहे.

स्वारस्य अभिव्यक्ती अर्ज तसेच योजनेच्या अटी व शर्ती सहाय्यक अभियंता (घकव्य ) पी / दक्षिण हयांच्या कार्यालयात रु.3300/- + 18% (जीएसटी) रोखीने दि.07/10/2024 ते 12/10/2024 रोजी स. 11.00 ते दु.04.00 वा. पर्यंत विकत मिळतील.

इच्छुक अशासकीय संस्था महानगरपलिकेच्या संकेतस्थळावर visit http://portal.mcgm.gov.in भेट देऊन स्वारस्य अभिव्यक्ती अर्जासाठी वरि. निरिक्षक (अति.निर्मु.) पी/दक्षिण यांच्याशी संपर्क करावा.

इच्छुक संस्थांनी आपले अर्ज वरि. निरिक्षक (अति.निर्मु.) पी/दक्षिण ह्यांच्या कार्यालयात दि. 07/10/2024 ते 12/10/2024 रोजी स. 11.00 ते दु.04.00 वा. पर्यंत सादर करावेत. नमूद केलेल्या कार्यालयीन कालावधी व वेळेनंतर दाखल करण्यात आलेले अर्ज विचारात घेण्यात येणार नाही. सदर योजनेच्या अटी व शर्ती नुसार पात्र ठरलेल्या संस्थांपैकी 01 संस्थेची दि.14/10/2024 रोजी स.05.00 वा अथवा या कार्यालयाच्या उपलब्धतेनुसार करण्यात येईल. सोडती बाबत सर्व अधिकार महानगरपालिका राखून ठेवत आहे.

पीआरओ/१५२६/जाही/२०२४-२५
**गप्पी मासे पाळा, मलेरिया टाळा.**

**सही/-**
**सहाय्यक आयुक्त,**
**पी / दक्षिण (प्र)**



**अंबरनाथ नगरपरिषद, अंबरनाथ**

जा.क्र. अंनप/विद्युत विभाग / २०२४-२५ / १०० | दि. ०४/१०/२०२४

मुख्याधिकारी, अंबरनाथ नगरपरिषद, विद्युत विभागा मार्फत खालील कामाकरिता कोटेशन मागवित आहेत.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजित रक्कम | इसारा रक्कम | फॉर्म फी |
|---|---|---|---|---|
| १ | अंबरनाथ पश्चिम डिफेन्स कॉलनी मुख्य रस्त्यावर स्ट्रीटलाईटची सोय करणे | रू. ९,९१,४६०/- | रू. ९,९१५/- | ५९०/- |

सदरचे कोटेशन बंद पाकीटात दि. १०/१०/२०२४ रोजी सायं. ५:०० वाजेपर्यंत अंबरनाथ नगरपरिषद कार्यालयात आणून द्यावेत. तसेच कोटेशन प्रशासनाच्या सोयीनूसार हजर कोटेशन धारकांसमक्ष उघडण्यात येतील. सदर कोटेशनचा तपशिल विद्युत विभागात उपलब्ध आहे.

शिक्का

**सही/-**
**मुख्याधिकारी,**
**अंबरनाथ नगरपरिषद, अंबरनाथ**



**मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ**
**महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचा घटक**

**ई-निविदा सुचना क्र. ११५/२०२४-२५**

कार्यकारी अभियंता [पश्चिम] विभाग, मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ (महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचा घटक) खोली क्र. ५३७, चौथा मजला, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१ (दुरध्वनी क्र. ०२२ ६६४०५४३२) म्हाडा व सार्वजनिक बांधकाम विभाग, मुंबई यांचेकडे नोंदणीकृत पात्र मुंबई उपनगर मधील सुशिक्षित बेरोजगार अभियंता यांना एकुण ३ कामाकरीता बी-१ (Item Rate) नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेत स्थळावर https://mahatenders.gov.in, उपलब्ध असतील. सदर निविदेचे वेळापत्रक खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | टप्पा | कालावधी | अ.क्र. | टप्पा | कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| १ | निविदा विक्री सुरू | ०५/१०/२०२४ सकाळी १०:३० वाजता | २ | निविदा विक्री बंद | १२/१०/२०२४ दुपारी ३:०० वाजता |
| ३ | तांत्रिक बोली उघडण्याचा दिनांक | १४/१०/२०२४ दुपारी ३:०५ नंतर | ४ | आर्थिक बोली उघण्याचा दिनांक | १५/१०/२०२४ सकाळी १०:३० नंतर |

सक्षम प्राधिकारी यांनी एक किंवा सर्व निवदा कोणतेही कारण न देता नाकारण्याचा अधिकार राखुन ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

टिप : १. विस्तृत ई- निविदा सुचना उपरोक्त संकेतस्थळावर उपलब्ध असेल.
टिप : २. निविदा सुचनेबाबत शुध्दिपत्रक / बदल असल्यास फक्त संकेतस्थळावर प्रकाशित केले जातील.

CPRO/A/902
Follow us:@mhadaofficial
म्हाडा - गृहनिर्माण क्षेत्रातील देशातील अग्रगण्य संस्था

**सही/-**
**कार्यकारी अभियंता (प),**
**मुं. झो. सु. मंडळ, मुंबई**



**मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ**
**महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचे घटक मंडळ**

**ई-निविदा सुचना**

कार्यकारी अभियंता [पूर्व] विभाग, मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ (महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचा घटक) खोली क्र. ५३६, चौथा मजला, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई- ४०००५१ ( दुरध्वनी क्र. ०२२६६४०५२५१) यांनी योग्य वर्गवारी तथा शासकीय किंवा निमशासकीय नोंदणीकृत ठेकेदाराकडून एकुण ०४ कामाकरीता बी - १ ( टक्केवारी ) नमुन्यातील ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागविण्यात येत आहेत. विस्तृत ई-निविदा सूचना व निविदा कागदपत्रे शासनाच्या संकेत स्थळ http://mahatenders.gov.in वर उपलब्ध असतील. निविदा विक्री दिनांक ०५.१०.२०२४ सकाळी १०.०५ पासून दिनांक १४.१०.२०२४ सायंकाळी ६.१५ पर्यंत राहील. निविदा सुचनेबाबत शुध्दिपत्रक / बदल असल्यास फक्त http://mahatenders.gov.in, संकेतस्थळावर प्रकाशित केले जातील. निविदा स्विकारण्याचा अथव नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता (पूर्व) मुं. झो. सु. मंडळ यांनी राखुन ठेवला आहे.

CPRO/A/ 888
Follow us:@mhadaofficial
म्हाडा - गृहनिर्मान क्षेत्रातील देशातील अग्रगण्य संस्था

**सही/-**
**कार्यकारी अभियंता (पूर्व).**
**मुं. झो. सु. मंडळ, मुंबई**



**मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ**
**महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचा घटक**

**ई-निविदा सुचना क्र. ११३ / २०२४-२५**

कार्यकारी अभियंता [पश्चिम] विभाग, मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ (महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचा घटक) खोली क्र. ५३७, चौथा मजला, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१ (दुरध्वनी क्र. ०२२ ६६४०५४३२) हे जिल्हा उप निबंधक-३ (पश्चिम उपनगरे) यांचेकडे नोंदणीकृत पात्र मजूर सहकारी संस्थांकडून एकुण १४ कामाकरीता बी- १ (Percentage Rate) नमुन्यातील निविदा ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवित आहेत. निविदा कागदपत्र शासनाच्या संकेत स्थळावर https://mahatenders.gov.in, उपलब्ध असतील. सदर निविदेचे वेळापत्रक खालील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | टप्पा | कालावधी | अ.क्र. | टप्पा | कालावधी |
|---|---|---|---|---|---|
| १ | निविदा विक्री सुरू | ०५/१०/२०२४ सकाळी १०:३० वाजता | २ | निविदा विक्री बंद | १२/१०/२०२४ दुपारी ३:०० वाजता |
| ३ | तांत्रिक बोली उघडण्याचा दिनांक | १४/१०/२०२४ दुपारी ३:०५ नंतर | ४ | आर्थिक बोली उघण्याचा दिनांक | १५/१०/२०२४ सकाळी १०:३० नंतर |

सक्षम प्राधिकारी यांनी एक किंवा सर्व निवदा कोणतेही कारण न देता नाकारण्याचा अधिकार राखुन ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही.

टिप : १. विस्तृत ई- निविदा सुचना उपरोक्त संकेतस्थळावर उपलब्ध असेल.
टिप : २. निविदा सुचनेबाबत शुध्दिपत्रक / बदल असल्यास फक्त संकेतस्थळावर प्रकाशित केले जातील.

CPRO/A/900
Follow us:@mhadaofficial
म्हाडा - गृहनिर्माण क्षेत्रातील देशातील अग्रगण्य संस्था

**सही/-**
**कार्यकारी अभियंता (प),**
**मुं. झो. सु. मंडळ, मुंबई**



Printed and Published by **Bhushan B.Mhatre** for Owner **Marik Media And Communication Pvt .Ltd.** at S.R.Publicatiinns ,Mohan Arjun Compound ,Godown No. 8,9 And 10 , Near Ghartan Pada ,Vaishali Nagar ,Last Bus Stop ,Dahisar (E ) ,Mumbai -400068 and Published From Marik Media And Communication Pvt .Ltd.,102, Shyam Sunder Sadan ,Sitaram Jadhav Marg, Lower Parel ,Mumbai 400013. Editor - **Deepak B. Mhatre**, E-mail vruttmanas1@ gmail.com ,telephone 2498546,24985609. Resident Editor - **Sham Deulkar**

**As per PRB Act Editorial Responsibilities On Deepak B. Mhatre Nespaper Related Desputes Lies Under Jurisdiction of Mumbai Courts**

**Year - Twenty Nine**
**Issu - 105**
**R.N.I. Registration No. - 65609/96**


मुद्रक आणि प्रकाशक **भूषण भा. म्हात्रे** यांनी मालक **मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि.** साठी, एस. आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंपाऊंड, गोडाऊन नं. ८,९ आणि १०, घारटन पाडाजवळ, वैशालीनगर लास्ट बस स्टॉप, दहिसर (पूर्व), मुंबई - ४०० ०६८ येथे छापून मरिक मीडिया अँड कम्युनिकेशन्स प्रा. लि., १०२, श्याम सुंदर सदन, सीताराम जाधव मार्ग, लोअर परळ (पश्चिम), मुंबई - ४०० ०१३ येथून प्रकाशित केले. संपादक - **दीपक भा. म्हात्रे,** E-mail: vrittamanas1@gmail.com दूरध्वनी क्रमांक - २४९८५४६, २४९८५६०९ निवासी संपादक - **शाम देऊलकर**

**पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी दीपक भा. म्हात्रे यांच्यावर राहील. सदर वृत्तपत्रासंबंधीच्या विवादित बाबी मुंबई न्यायालय क्षेत्रात येतील.**

**वर्ष- एकोणतीसावे**
**अंक - १०५**
**आर.एन.आय. रजिस्ट्रेशन क्र.- ६५६०९/९६**


ठाणे महानगरपालिका
महा मेट्रो
THANE RING METRO
सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
एम एम आर डी ए
MMRDA
CIDCO
MMRC
नरेंद्र मोदी
प्रधानमंत्री
एकनाथ शिंदे
मुख्यमंत्री
महाराष्ट्रासाठी ₹ 33,000 कोटींच्या
वेगवान विकासाची भेट
प्रधानमंत्री नरेंद्र मोदी
यांच्या शुभहस्ते
महत्वाकांक्षी प्रकल्पांचा भूमिपूजन, शुभारंभ आणि लाभ वितरण सोहळा
महाराष्ट्रातील पहिली भूमिगत मेट्रो
कुलाबा-वांद्रे-सीप्झ : मुंबई मेट्रो मार्गिका - 3 टप्पा-1 (आरे जेव्हीएलआर ते वांद्रे-कुर्ला कॉम्प्लेक्स स्थानक) शुभारंभ
• रोज सुमारे 17 लाख प्रवाशांची वाहतूक
• आरे जेव्हीएलआर ते वांद्रे-कुर्ला कॉम्प्लेक्स- 12.69 किमी
• एकूण- 10 स्थानके (9 भूमिगत व एक 1 जमीन स्तरावरील स्थानक)
परिवर्तनशील प्रवास, भविष्याला आकार
ठाणे शहरांतर्गत वर्तुळाकार मेट्रो रेल्वे प्रकल्पाचे भूमिपूजन
• अखंड कनेक्टिव्हिटी आणि प्रवासाच्या वेळेत होणार बचत
• एकूण लांबी: 29 किमी
• आधुनिक आणि सुसज्ज 22 स्थानके
मुंबई प्रवासात... वेळ आणि इंधन कपात
पूर्व मुक्त मार्ग विस्तार छेडा नगर, घाटकोपर ते आनंद नगर, ठाणे प्रकल्पाचे भूमिपूजन
• दक्षिण मुंबई-ठाणे प्रवास वेगवान होणार
• ठाणे, नवी मुंबई आणि पूर्व उपनगराला दक्षिण मुंबईशी जोडणारा उन्नत मार्ग
• छेडा नगर ते आनंद नगर, ठाणे दरम्यान 13.40 किमी लांबीचा पूर्व मुक्त मार्ग विस्तार
सुनियोजित शहराची उभारणी, आरामदायी जीवनमानाची हमी!
नैना नगर रचना परियोजनेंतर्गत विविध पायाभूत सुविधा कामांचे भूमिपूजन
• जागतिक दर्जाच्या सोयीसुविधा मिळाल्याने शहरांचा सुसज्ज विकास
• प्रथम टप्प्या अंतर्गत 42 चौ. कि.मी. क्षेत्राचा विकास
• 9 उड्डाणपूल, 12 लहान पूल, 26 पादचारी भुयारी मार्ग, 1 वाहन भुयारी मार्ग आणि एकूण 17.59 कि.मी. लांबीच्या रस्त्याचा समावेश
प्रशस्त इमारत करेल नागरिकांचे स्वागत
ठाणे महानगरपालिकेच्या नूतन इमारतीचे भूमिपूजन
• कार्यालये एकाच इमारतीत आल्याने नागरिकांना सुविधा मिळणार
• किल्ल्याच्या स्वरूपात इमारतीची रचना
• आधुनिक कार्यक्षमतेची 32 मजल्याची प्रशासकीय इमारत व महासभेची 5 मजली इमारत
सक्षम महिला... विचार पहिला
मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थ्यांचा सत्कार
• महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणाला मिळाली गती
• लाभार्थी महिलांना लाभाचे प्रातिनिधिक वितरण
• आत्तापर्यंत 1.96 कोटी भगिनींना लाभाचे वितरण
शनिवार, 05 ऑक्टोबर 2024
दुपारी 1:00 वाजता
बोरीवडे मैदान, घोडबंदर रोड, ठाणे
डी.जी.आय.पी.आर/आरओसी२०२४-२५/क्र.५/सी ३९६४
माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन
/MahaDGIPR
mahasamvad.in
MAHARASHTRADGIPR
थेट प्रक्षेपण DD NEWS

व्यवसायात मिळणारे मोठे यश कधीच एका व्यक्तीमुळे मिळत नाही त्यासाठी सगळ्यांनी एकत्रित येत केलेल्या कामामुळे ते मिळवता येते.



- स्टीव्ह जॉब्स
अमेरिकन उद्योगपती

वृत्तमानस
मुंबई, शनिवार, ५ ऑक्टोबर २०२४

# बाजारीकरणात अडकले 'दिन'

एखादा दिवस अथवा सप्ताह हा आपल्याकडे केवळ प्रचारी तंत्र व बाजारीकरणाच्या चौकटीत अडकल्याचे चित्र दिसत असते. मग तो सण, समारंभ असो अथवा एखादा समाज उपयोगी बाबीचा दिवस. वाहतूक सुरक्षितता सप्ताह हा अनेकदा साजरा केला जातो, पण तो केवळ एक उपचार ठरतो. एरव्ही या वाहतूक नियमांना पायदळी तुडवण्यात जवळपास सर्वच आसुसले असतात. असाच एक सप्ताह बुधवारपासून सुरू झाला असला तरी त्याचे कोणालाच सोयरसुतक नाही. कारण या सप्ताहाचे समाजमाध्यमांवर आपले प्रसिद्धीकरण करणे तसे अडचणीचे. त्यामुळे लाइकच्या आभासी मोह बाळगणारे याकडे पाठ फिरवून आहेत ही यातील खरी गोम. हा सप्ताह वन्यजीव सप्ताह म्हणून साजरा होत असला तरी त्याची माहिती अनेकांना नाही. जैवविविधतेचा घटक असलेले वन्यप्राणी हे मानवी जीवनाचाही एक अविभाज्य घटक आहेत. या वन्यजीवांच्या निसर्गातील महत्त्वाविषयी, त्यांच्या जनजागृतीविषयी माहिती व्हावी म्हणून केंद्रीय वन्यजीव मंडळाने वन्यजीव सप्ताहासाठी पुढाकार घेतला. केंद्रीय वन्यजीव मंडळाच्या स्थापनेनंतर भारतातील वन्यजीवांच्या संरक्षणाच्या दीर्घकालीन उद्दिष्टांबद्दल जागरूकता निर्माण करण्यासाठी १९५२ साली वन्यजीव सप्ताहाची संकल्पना मांडण्यात आली होती. सुरुवातीला १९५५ साली वन्यजीव दिन साजरा करण्यात आला. त्यानंतर १९५७ मध्ये खऱ्या अर्थाने वन्यजीव सप्ताहाची सुरुवात झाली. २ ते ८ ऑक्टोबर या कालावधीत साजरा होणारा वन्यजीव सप्ताह दरवर्षी एका संकल्पनेवर आधारित असतो. या वर्षीदेखील देशभरात वन्यजीव सप्ताह साजरा करण्यात येत असून, सहजीवनाद्वारे वन्यजीव संरक्षण ही संकल्पना आहे. हा सप्ताह साजरा होत असला तरी वास्तव काही वेगळेच आहे. शेती व उद्योगधंद्याच्या विस्तारासाठी तसेच नद्यांच्या प्रकल्पासाठी जमिनीची मागणी सारखी वाढत राहिल्यामुळे गेल्या काही काळात वनांचा सतत नाश होत असून, त्याकडे कानाडोळा करण्यात धन्यता मानण्यात येते. आज गावागावात दिसत असलेली ही वनराई पूर्वजांनी सातत्याने केलेल्या वृक्षसंवर्धनाची जाणीव करून देते. परंतु आज वनांचा ऱ्हास होतो आहे आणि वृक्षसंवर्धनाची जागा अतिक्रमणे, अनिर्बंध तोडणे, वणवे आणि अनियंत्रित चराई यांनी घेतली आहे. अद्याप आपल्या देशात इंधन म्हणून जळाऊ लाकडांचा प्रामुख्याने उपयोग केला जातो. जळाऊ लाकडासाठी प्रामुख्याने जंगलावरच अवलंबून राहावे लागते. दरम्यान, बेसुमार जंगलतोड झाली, डोंगरांचे खाणींसाठी उत्खनन झाले. वन्यप्राणी मानवी वस्तीत घुसण्याचे प्रकार गेल्या अनेक दिवसांपासून वाढले आहे. बिबटे वाघ, गवे रेडे, रानडुक्कर, मोर, माकडे, हत्ती आदी वन्यप्राण्यांचे मानवी वस्तीत घुसून धुमाकूळ घालण्याचे प्रकार कोल्हापूर तसेच कोकणामधील अनेक गावांत गेल्या काही महिन्यांत घडले आहेत. वन्यप्राण्यांनी मानवावर हल्ले करण्याचे प्रकार घडले आहेत. त्यामुळे मानवी वस्तीत घबराटीचे वातावरण निर्माण होण्यापेक्षाही शेती-बागायती पिकांची जी मोठी हानी झाली त्याची भरपाई कोण करणार, हा कळीचा मुद्दा आहे. मानवाने स्वतःच्या स्वार्थासाठी वन्यप्राण्यांची वस्ती उद्ध्वस्त केली. त्यामुळे मानवी वस्तीवर वन्यप्राण्यांचे हल्ले एवढे वाढले आहे की, आता ती एक गंभीर समस्या बनलेली आहे. मानवी जीवन आणखी धोक्यात येण्याची शक्यता नाकारता येत नाही. मुळातच ही समस्या मानवनिर्मित आहे. रानावनात वास्तव्य करणाऱ्या वन्यप्राण्यांचे जीवन धोक्यात आल्याने त्यांनी मानवी वस्तीत निवारा मोर्चा वळविला आहे. सध्या वन्यप्राणी आपल्या जीवन अस्तित्वासाठी संघर्ष करीत आहेत. हा संघर्ष सध्या सीमित आहे. तो आणखी वाढला तर त्याचा धोका मानवालाच अधिक आहे, ही गोष्ट ध्यानात घेऊन उपाययोजना व्हायला हवी. त्याकरिता समस्या निर्मितीमागची कारणे शोधून त्यावर उपाय करण्याची आवश्यकता आहे. पकडलेल्या वन्यप्राण्यांना वन खाते दुसऱ्या वन्यप्राणी वस्तीत सोडून दिले जाते, पण हा त्यावरती उपाय नव्हे. वन्यजीवांच्या संरक्षणासाठी देशात राष्ट्रीय उद्यान, अभयारण्य, व्याघ्र प्रकल्पांची निर्मिती करण्यात आली आहे. त्यानंतरही वन्यप्राण्यांच्या अधिवासात होणाऱ्या मानवी घुसखोरीमुळे, वेगवेगळ्या प्रकल्पांमुळे वन्यप्राणी त्यांच्या अधिवासातून बाहेर पडतात. त्यामुळे मानव-वन्यजीव संघर्ष वाढला आहे. अधिवासाचा ऱ्हास, अवैध शिकार, विकास प्रकल्प यामुळे वन्यप्राण्यांच्या अधिवासासह घटकाला सोबत घेऊन सप्ताहातील कार्यक्रमाची आखणी केली जात होती. मात्र आता वन विभाग स्वतःच कार्यक्रम ठरवत असल्याने वन्यजीव सप्ताह ज्या उद्देशाने सुरू करण्यात आला होता, तो मूळ उद्देश आता हरवत चालला आहे. प्रत्यक्षात या संकल्पनेचा विसर हा सप्ताह साजरा करताना वन खात्याला पडलेला दिसतो. कधी तरी पहिल्या दिवशी ही संकल्पना राबवली जाते आणि इतर दिवशी दरवर्षीप्रमाणे चर्चासत्र, छायाचित्र स्पर्धा, विद्यार्थी, जंगलफेरी असे ठरावीक कार्यक्रम राबवले जातात. यात इतर विभाग, सामान्य नागरिक यांना सहभागी करून घेतले जात नाही. वृक्षवल्ली आम्हा सोयरी वनचरे या भावनेने वृक्षांकडे पाहिले जायचे. आज ती दृष्टी लयास जात आहे. वृक्षतोड करून किती पैसा जमवता येईल हा व्यवहारी दृष्टिकोन ठेऊन आपण कृती करतो. वन्यप्राण्यांचेही कुटुंब जीवन आहे, ही दृष्टी ठेऊन त्यांना संरक्षण देण्याऐवजी आपण केवळ धन- द्रव्याच्या हव्यासापायी त्यांची हत्या करून विक्री करतो. हे तर जीवन शोषक आहे. प्रत्येक जीव, प्राणीमात्र स्वतःवरती प्रेम करतो. वन्यप्राणीही त्याला अपवाद नाहीत, हे आपल्या लक्षात यायला हवे. आपण आपली मानसिकता बदलायला हवी. तसे झाले तर वन्यप्राणी-मानवी संघर्षातून सुटका होईल. त्यांचे अस्तित्वदेखील धोक्यात आले आहे. वन्यजीव संरक्षण आणि संवर्धनासाठी अनेक कायदे असले तरीही अंमलबजावणीचा अभाव हे त्यातले दुखणे आहे. त्यामुळे या सर्वांविषयी जनजागृती करण्याच्या उद्देशाने देशभरातील संरक्षित क्षेत्रात वन्यजीव सप्ताह साजरा केला जातो. जंगल क्षेत्रातील वन्यजीवांचा अधिवास सुरक्षित राहून त्यांचे संरक्षण व संवर्धन व्हावे हा त्यामागचा खरा उद्देश आहे. कारण पृथ्वीवर राहण्याचा हक्क जेवढा माणसांना आहे तेवढाच तो वन्यप्राण्यांनाही आहे. वनसंपत्तीचे जतन करणे, नवी वनराई निर्माण करणे, डोंगरमाथ्यावर शिल्लक राहिलेल्या जंगली झाडांची लागवड करणे या गोष्टी युद्धपातळीवर व्हायला हव्यात. भविष्यात काही गोष्टी उलटल्यानंतर का होईना, वन्यप्राण्यांना निवाऱ्यासाठी वने उपलब्ध होतील. बेसुमार भू-उत्खनन, बेकायदेशीर व्यवसाय थांबायला हवेत. नैसर्गिक संपत्तीचे संवर्धन व्हायलाच हवे. रानडुकरांची शिकार करण्याची चटक लागलेले लोक फासे लावतात. त्या फाशात रानडुकराऐवजी बिबटे अडकून पडल्याचे काही प्रकार उघडकीस आले आहेत. ही बेकायदा हत्या थांबवणे गरजेचे आहे. वन्यजीवांच्या संरक्षण व संवर्धनासाठी प्रत्यक्षात काम करणारे स्वयंसेवी आणि स्वयंसेवी संस्थांची फळी अगदी मोजकी आहे. प्रसिद्धीसाठी या सर्वांचा वापर करून घेणारी फळी मात्र फार मोठी आहे. ही मोठी फळीच वन्यजीवांच्या संरक्षण व संवर्धनाचा देखावा करीत प्रसिद्धी माध्यमावर स्वतःचे कोडकौतुक करते. त्यामुळे काही विशिष्ट स्वयंसेवी संस्था, स्वयंसेवी यांनाच सप्ताहात सहभागी करून घेतले जाते. यात वन्यजीवांच्या संरक्षण व संवर्धनासाठी प्रत्यक्षात काम करणारी स्वयंसेवी संस्था, स्वयंसेवी मात्र बाजूलाच राहतात. वन्यप्राणी व मानव यामधील वाढता संघर्ष दोन्ही घटकांना हानिकारक आहे. दोन्ही घटकांचे जीवन धोक्यात आणणारा आहे. म्हणून वरकरणी क्षुल्लक वाटणाऱ्या या विषयावर सकारात्मक दृष्टिकोन ठेवून विचारमंथन व्हायला हवे. अलीकडच्या काही वर्षांत वन्यजीव सप्ताह साजरा करणे हा एक प्रकारे इव्हेंट बनत चालला आहे. या इव्हेंटमध्ये वन्यजीवांचे व त्यांच्या अधिवासाचे संरक्षण कितपत केले जाते, हा खरोखरच संशोधनाचा विषय आहे.

# राजापूर केळवलीची नवसाला पावणारी श्री नवला देवी

मधुसूदन हरयाण

सर्वांग सुंदर कोकणातील काही जागृत देवस्थाने प्रसिद्ध आहेत. रत्नागिरी जिल्ह्यातील राजापूर तालुक्यातील केळवलीची नवसाला पावणारी श्री नवला देवी हे देवस्थान प्रसिद्ध आहे. राजापूर तालुक्याच्या ठिकाणापासून २० कि.मी. अंतरावर, सिंधुदुर्ग जिल्ह्याची सीमा खारेपाटण शहरापासून ७ कि. मी. अंतरावर तसेच वैभववाडी तालुक्यातील तिथवली या गावापासून अवघ्या २ कि.मी अंतरावर जामदा नदीच्या तीरावर व तीन तिठ्याच्या वाटेवर गर्द अशा राईमध्ये निसर्गाने नटलेल्या हिरव्यागार झाडांमध्ये वसलेले अतिभव्य व सुंदर असे श्री नवलादेवीचे देवस्थान आहे. प्रत्येक गावातील देवी ही गावाकडे पहात मंदिरात बसलेली असते परंतु श्री नवलादेवी गावाकडे पाठ करून गावातील गावकऱ्यांच्या रक्षणासाठी सदैव उभी आहे. केळवली गावातही निसर्गाने आपले सौंदर्य भरभरून उधळलेले आहे. गावाला निसर्गाने भरभरुन सौंदर्य प्रदान केल्यामुळे देवालयाकडे जाणारे भाविक प्रथमच मंत्रमुग्ध होतात आणि नंतर देवीच्या दर्शनाने प्रसन्न होतात. निसर्ग ही देवीचीच देणगी आहे. येणारा प्रवेश करताच नकळत त्याच्या तोंडून शब्द येतात,

**तीन तिठ्याच्या वाटेवरी,
जामदा नदीच्या काठावरी। भक्तिची माय माऊली,
नवलाई ती खरोखरी॥**

देवी नवला देवीचे मंदिर फार पुरातन असून, आकाराने मोठे आहे. मानकरी, गावकरी व भाविकांच्या सहकार्याने मंदिराचा जीर्णोद्धार केलेला आहे. तसेच सुधारणेची कामे चालू आहेत. श्री नवलादेवीची मुर्ती पाषाणाची असून मुर्ती फार पुरातन आहे. नवलादेवीच्या मंदिराच्या गाभाऱ्यात नवलादेवीच्या उजव्या व डाव्या बाजूला गाव रहाटीच्या मुर्त्या आहेत. देवीच्या सत्वामुळे आणि भक्तांना मिळणाऱ्या गुणामुळे माता नवलादेवी मुंबई, गोवा, कोल्हापूर, सातारा, सांगली, मिरज, कऱ्हाड,कर्नाटकातील धारवाड व आजूबाजूच्या परिसरातील लोकांना परिचित आहे.

नवलादेवीच्या मंदिरात शिमग्याला होळी उत्सव तसेच शिमगोत्सव साधारण दहा दिवस चालतो. शिमग्याला देवीची पालखी सजविली जाते व ढोल ताश्यांच्या गजरात संपूर्ण गाव दुमदुमतो. शिमगोत्सव गावातील प्रत्येक ग्रामस्थांच्या घरी देव जातो.देवीची पालखी घरोघरी नेली जाते. त्यावेळी ग्रामस्थ मोठ्या उत्साहाने तिची खणा-नारळाने ओटी भरुन तिची पुजा, सेवा करतात.

राखी पौर्णिमेला राखी पौर्णिमा साजरी केली जाते. श्रावणात प्रत्येक मंगळवारची वारी साजरी केली जाते. नवरात्रौत्सव नऊ दिवस साजरा केला जातो. तसेच दसऱ्याच्या दिवशी सोने (आपट्याची पाने) लुटण्याचा कार्यक्रम मोठ्या उत्साहात ढोल ताशांच्या गजरात साजरा केला जातो. तुळशी विवाहादिवशी तुळशी विवाह उत्सव असंख्य ग्रामस्थांच्या उपस्थितीत साजरा केला जातो. त्रिपूरी पौर्णिमेदिवशी त्रिपुरी उत्सव रात्री ८ ते दुसऱ्या दिवशी पहाटे ६ वाजेपर्यंत साजरा केला जातो. या दिवशी गावातील स्थानिक भजने तसेच पंचक्रोशीतील भजनांचा कार्यक्रम असतो. त्रिपुरी पौर्णिमेनंतर नवलादेवीचा सर्वात मोठा उत्सव म्हणजेच देवीचा जत्रोत्सव, मार्गशिर्ष शुद्ध प्रतिपदेदिवशी मोठ्या उत्साहात व थाटात साजरा केला जातो. रत्नागिरी जिल्ह्यातील प्रसिद्ध जत्रांपैकी श्री नवला देवीची जत्रा प्रसिद्ध आहे. जत्रेचे वैशिष्ट्य म्हणजे देवळाच्या भोवती पुरुष मंडळी (नवसिक) लोटांगण घेतात तसेच सवाष्ण स्त्रिया आपल्या पदराने देवीचा दरबार लोटतात. देवीची ओटी भरण्यासाठी तर स्त्रियांची मोठीच मोठी रांग लागलेली असते. हा जत्रौत्सव दीड दिवसांचा असतो.

राजापूर तालुक्यातील केळवली हे गाव या गावाची लोकसंख्या ५५०० च्या वर आहे. हे गाव १२ वाड्यांचे





मिळून बनले आहे. या गावची लोकसंख्या जरी ५५०० च्या आसपास असली तरी काही लोक नोकरी धंद्यानिमित्त बाहेर गावी असतात. जत्रा जवळ आली की आपल्या घरी ही मंडळी न विसरता येतात. आणि केळवलीत येणाऱ्या प्रत्येक भक्ताच्या स्वागतासाठी ही मंडळी सज्ज राहतात. म्हणजेच श्री नवलादेवी मातेच्या जत्रेच्या अगोदर दोन दिवसांपासून नातेवाईक, हितचिंतक यांची गर्दी होऊ लागते. ओळखीचे काही भक्त ओळख सांगत केळवलीत येतात आणि जत्रेत सामील होतात. जत्रेच्या आदल्या दिवशी पालखी, जागर दिपोत्सव कार्यक्रम होतात.

राजसत्तेचा प्रभुदेसाई तर पूर्वसत्तेचा हरयाण हे दोन प्रमुख मानकरी असून,लिंगायत हे दररोज देवीची पूजा करतात तर जत्रा,शिमगोत्सव व इतर प्रमुख उत्सवादिवशी गावचे ब्राम्हण सप्रे हे देवीची विधियुक्त पूजा करतात.या शिवाय रोग्ये,शेंगाळे,मस्तेकर,केळवलकर,इंगळे,तांबे हे देवीचे मानकरी आहेत. या देवालयाचे मानकरी, संयोजक देवीचे दर्शन व नवस फेडण्यासाठी स्त्री-पुरुषांच्या वेगवेगळ्या रांगा लावतात. त्यामुळे देवीचे दर्शन घेण्यासाठी भाविकांचा शिस्तबद्ध कार्यक्रम सुरु होतो. या देवीचे वैशिष्ट्य म्हणजे येथे जातीभेद मानला जात नाही हा या देवीचा लौकिक आहे.

**केळवली पंचक्रोशी, तुझे गुणगान गाई। महार, चांभार, मुस्लिम, मांग तुला भेद नाही॥**

नवला देवीच्या दरबारात आल्यावर प्रत्येक भाविक आपले वाईट गुण व खोड्या विसरुन जातो व त्यांच्यात सुधारणा होते हे देवीचे सत्व आहे. त्याने जामदा नदीच्या पाण्यात आपले हात पाय धुतल्यावर त्याची पापे विरतात असा भाविकांचा समज आहे.

कारण भक्तजन जामदा नदीला नवला देवीची बहिणच मानतात.

**जामदा नदी बहीण तुझी, भक्तांचे पाप धुई, चोर, मवाली, भोंदू बुवा, बुवा, गुण विसरुन जाई॥**

एवढी अपार शक्ती नवला देवी मातेत आहे. भाविकांच्या गर्दीची रांग दुसऱ्या दिवशी दुपारी १ वाजेपर्यंत असते. देवीच्या गाभाऱ्याच्यामध्ये भाविकांना पहिल्या दिवशी अलोट गर्दीमुळे दर्शन घडत नाही. गाभाऱ्या पुढील सभा मंडपात भाविकांनी ठेवलेले नवस मानन्विण्यासाठी आणि भाविकांची गाऱ्हाणी सांगण्यासाठी गावाचे गावकार (हरयाण) नवसफेड व नवस बोलणी करतात.

* कठीण काळी नवस करता नवसाला पावते,

**दुःख दैन्य ते नवलाईने, क्षणामध्ये घालविले। असे दयेची सरिता खरी, धावून येई, वरचे वरी, भक्तीची माय माऊली, नवलाई ती खरोखरी ॥**

अशी ही नवला देवी माता नवलासा पावणारी व भक्तांची मनोकामना पूर्ण करणारी आहे.

**नवलाईच्या चरणी आहे, सुखशांतीचा झरा, चमत्कार तो पाहून घ्यावा, जत्रे दिवशी खरा ॥**

मंदिराभोवती पालखीच्या पाच प्रदक्षिणा-पालखी पुढे भाविकांचे टाळ, मृदुंगाच्या गजरात देवीचा जयजयकार, लोटांगण, दरबार लोटणे, गुलाल, फुले, सुगंधी द्रव्ये पालखीवर उधळली जातात. जत्रेच्या आदल्या दिवशी मध्यरात्री १२ वाजल्यानंतर लोटांगण व दरबार लोटणे उपवास सुरु होतो. लोटांगण व दरबार संपूर्ण होऊन म्हणजेच पालखीच्या पाच प्रदक्षिणा पूर्ण झाल्यानंतर जामदा नदीच्या पाण्यात आंघोळ केल्या नंतर व देवीचे बहीण बसका देवीची भेट घेण्यासाठी देवीची पालखी बसका देवीचे स्थान मंदिरापासून दोन कि. मी. आहे. तेथे जाते व तेथून आल्यावर व देवीच्या गाभाऱ्यात येऊन देवीचे दर्शन घेतल्यावर उपवास सुटतो.

लोटांगणे दुपारी १ वाजता सुरु होतात, लोटांगण चक्क आंघोळ केल्यावर सुरु होतात. यावेळी देवीच्या मायेचा संचार खांद्यावर तरंगकाठी घेऊन लोटांगणे घालणाऱ्या भाविकांचे संरक्षण करत असतो. असे मानकरी व गावकरी आवर्जून सांगतात तसेच देवीचा दरबार लोटणाऱ्या स्त्रियांचे मनोबल पूर्ण होते. त्यांच्या कुटुंबात (संसारात) लक्ष्मी वास करते, असे भाविक सांगतात. देवीच्या मायेचा संचार पिशाच्च बाधा झालेल्या मंडळींचे पिशाच्चापासून मुक्ती करण्याचा कार्यक्रमही असतो. या कार्यक्रमातही मोठा सहभाग असतो. याला जरी अंधश्रद्धा म्हणत असली तरी असा कार्यक्रम यशस्वी होतो.

त्यामुळे या जत्रेचा लौकिक फार मोठा आहे. (पिशाच्च बाधा म्हणजेच मनाने कमकुवत व नाऊमेद झालेली माणसे), मार्गशिर्ष शुद्ध सप्तमीला मंदिरात सप्ताह साजरा कला जातो. पंचक्रोशीतील भजनांचा कार्यक्रम देवालयात असतो. जमलेल्या वस्तुंचा लिलाव केला जातो. जो पैसा जमा होईल तो देवीच्या वार्षिकासाठी वापरला जातो.

# 'तंत्रज्ञानाचा बादशहा' स्टीव्ह जॉब्स

**आजच्या टेक्नोसॅव्ही युगात मोबाईल, आयफोन, टॅब्लेट, कॉम्प्युटर, लॅपटॉप ही उपकरणे वापरणाऱ्या कोणत्याही व्यक्तीला स्टीव्ह जॉब्स हे नाव माहीत नसेल हे अशक्यच आहे. स्टीव्ह जॉब्स ज्याने ॲपल ही कंपनी सुरू केली आणि ती आज जगातील सर्वात यशस्वी कंपनी बनवली, त्याच ॲपल कंपनीचा संस्थापक, तंत्रज्ञानाचा बादशहा स्टीव्ह जॉब्स यांचा आज स्मृतिदिन.**

स्टीव्ह जॉब्स यांचा जन्म २४ फेब्रुवारी १९५५ रोजी अमेरिकेतील ग्रीन बे या गावी झाला. सिरियाचा मुस्लिम विद्यार्थी अब्दुल फतेह व जोहान शिबिल यांनी विवाहाआधी जन्मलेले मूल एका अनाथालयाला दिले. तेथून पॉल - क्लारा जॉब्स या आर्मेनियन कुटुंबाने त्याला दत्तक घेतले. दत्तक घेताना या कुटुंबाने या मुलाला पदवी पर्यंतचे शिक्षण देईल आणि सुखात ठेवेल असे वचन दिले; पण जॉब्स दांपत्य गरीब असून ते मजुरी करत आहेत, हे समजल्यावर स्टीव्हच्या मातापित्यांनी त्यावर आक्षेप घेतला. सहा महिन्यांच्या चर्चेनंतर ते स्टीव्हला जॉब्स दांपत्याला दत्तक द्यायला तयार झाले. स्वतः गरीब असून, मोलमजुरी करूनही जॉब्स दांपत्याने दिलेले वचन पूर्ण केले. लहानपणी स्टीव्ह एकलकोंडा होता. आपण कोणालाच नको आहोत, अशी त्याची भावना बनली होती.

हायस्कूलमध्ये असताना स्टीव्हला ह्युलेट पॅकर्ड या कारखान्यात काम करण्याची संधी मिळाली. जिथे त्याची स्टीव्ह व्होजनियाकसोबत ओळख झाली. तेंव्हा स्टीव्ह जॉब्स १६ वर्षाचा तर स्टीव्ह व्होजनियाक २१ वर्षाचा होता. दोघांची मैत्री होण्याचे कारण म्हणजे दोघांना तंत्रज्ञानाची आवड होती. व्होजनियाकने व्हिडिओ गेमचा टेलिटाईप व मायक्रोप्रोसेसर बनवला होता. स्टीव्ह जॉब्सला त्याच्यावर खूप विश्वास होता. १९७० नंतर कॉम्प्युटर क्षेत्रात नवनवे बदल व प्रयोग होत होते. नवनिर्मितीचा ध्यास असणाऱ्या स्टीव्ह जॉब्स यांनी ही संधी साधून १९७६ मध्ये व्होजनियाकवर कॉम्प्युटर निर्मितीची जबाबदारी सोपवली आणि स्वतः मार्केटमध्ये लक्ष घातले. कॉम्प्युटर तयार झाला. कंपनी देखील बनली. कंपनी रजिस्टर करायची पण कोणत्या नावाने हा प्रश्न होता. अनेक नावे समोर आली पण ती स्टीव्हला पसंत पडली नाही. त्याच्या घरासमोर सफरचंदाचे झाड होते. एका सकाळी त्याने झाडाचे सफरचंद तोडून खायला सुरवात केली आणि त्याला कंपनीचे नाव सुचले ॲपल. पुढे याच नावाने कंपनी रजिस्टर झाली. त्यांना लगेच ५० कॉम्प्युटरची ऑर्डरही मिळाली. अशा प्रकारे वयाच्या २१ व्या वर्षीच कॉम्प्युटर क्षेत्रात शिरला आणि एका कंपनीचा मालक बनला. त्याच्याकडे तंत्रज्ञानाची पदवी नव्हती ; पण कल्पना होत्या. मॅनेजमेंटचे कौशल्य होते. त्याने तंत्रज्ञानात तरबेज असणारी माणसे निवडली. बाजारपेठेच्या



गरजेची नस पकडत त्याने एकापेक्षा एक अत्याधुनिक आणि सरस उत्पादने धुमधडाक्यात उतरवली. त्याने बाजारपेठेत आणलेल्या ॲपल 1 पीसी या पर्सनल कॉम्प्युटरला खूप मागणी होती. कंपनी चालवताना स्टीव्ह ने अनेक धडाकेबाज निर्णय घेतले; पण हे करताना त्याने अनेकांची मने दुखावली. त्यामुळे सहकाऱ्यांशी त्याचे मतभेद वाढले. शेवटी त्याने आपणच स्थापन केलेली ॲपल कंपनी सोडली. १९८६ मध्ये त्याने चित्रपट दिग्दर्शक जॉर्ज लुकास सोबत भागीदारी करून एक कंपनी स्थापन केली. त्या कंपनीचे नाव पिक्सार असे होते. या कंपनीने ॲनिमेशन सिनेमे बनवले. ते खूप गाजले. या कंपनीने वॉल्ट डिस्ने सोबत करार केल्याने या कंपनीने खूप पैसे कमावले. इकडे स्टीव्ह जॉब्स सोडून गेल्यापासून ॲपल कंपनी मात्र तोट्यात आली. आयबीएम, मायक्रोसॉफ्ट या कंपन्यांपुढे ॲपलचा निभाव लागत नव्हता. अखेर १९९७ ला स्टीव्ह जॉब्स पुन्हा ॲपलमध्ये परतले. आपल्या कल्पक बुद्धीने त्यांनी ॲपलला पुन्हा अव्वल स्थानी पोहचवले. आयबीएम, मायक्रोसॉफ्ट या कंपन्यांनी कॉम्प्युटरमध्ये मक्तेदारी सिद्ध केल्याने काही तरी नवे करण्याची उर्मी स्टीव्हला आली त्यातूनच त्याने आयफोन, आयपॉड, आयपॅड बाजारात सादर केले. त्यांच्या या दुरदर्शीपणाला जगाने सलाम केला. २००१ मध्ये ॲपलने ५ गिगाबाईट क्षमतेचा आयपॉड तयार केला. हा सर्वात लहान म्युजिक प्लेयर होता. त्यात एक हजार गाणी स्टोअर करता येत.

हा आयपॉड अल्पावधीतच लोकप्रिय झाला. या आयपॉडने वॉकमनला कायमचे घरी बसवले. २००७ मध्ये ॲपलने टचस्क्रीन मोबाईल मार्केटमध्ये आणला. टचस्क्रीन आणि अतिशय सोप्या इंटरफेसमुळे तो खूप लोकप्रिय झाला. थ्री जी मोबाईल देखील ॲपलनेच सर्वप्रथम सर्वात आधी मार्केटमध्ये आणला. २०१० मध्ये आलेल्या पहिल्या टॅबलेट पीसीने जगभरातील गॅजेट प्रेमींना वेड लावले. सतत नवीन काहीतरी करून तंत्रज्ञानात आपले वर्चस्व निर्माण करणाऱ्या स्टीव्ह जॉब्स यांना भारताविषयी खूप प्रेम होते. ते अनेकदा भारतात येऊन गेले. भारतातील अध्यात्म आणि बौद्ध धर्माविषयी त्यांना खूप कुतूहल होते. नवनिर्मितीचा ध्यास, तंत्रज्ञानाची आवड, मार्केटिंगमधील कौशल्य, सतत शिखरावर राहण्याची जिद्द या गुणांमुळे स्टीव्ह जॉब्स हा जागतिक कीर्तीचा तंत्रज्ञ ठरला. त्याचा प्रतिस्पर्धी मायक्रोसॉफ्ट कंपनीचा मालक बिल गेटदेखील त्याच्या या गुणांची कदर करायचा. बिल गेटने तर त्याला आधुनिक युगाचा एडिसन अशी पदवी दिली. ५ ऑक्टोबर २०११ रोजी वयाच्या अवघ्या ५६ व्या वर्षी तंत्रज्ञानाच्या या बादशहाने जगाचा निरोप घेतला. तंत्रज्ञानाच्या या बादशहाला स्मृतिदिनी विनम्र अभिवादन!

- श्याम ठाणेदार,
पुणे

## पत्र मानस

### लोकप्रतिनिधींनी आपला फंड विचारपूर्वक वापरावा

नगरसेवक,आमदार, खासदारांना जनतेच्या सोयी सुविधांसाठी ठराविक फंड हा विकास कामांसाठी दिला जातो. प्रत्यक्ष पाहणी केल्याशिवाय फंड वापरला गेला तर लोकांच्या गरजेशिवाय सुविधा दिल्या असे होईल. म्हाडाच्या इमारतींना कंपाऊंड घालण्याची खरोखरच गरज नसताना कंपाउंड घालण्याचे काम केले गेलेले आहे.म्हाडाच्या इमारतीना बाहेरील जागा सोसायटीच्या आत घेण्याचा अधिकार असत नाही. तरी माहिती न घेता फंडातुन कामे साईवाडी, अंधेरी पूर्व भागात म्हाडाच्या इमारतीत केलेली आहेत. काही म्हाडाच्या इमारतीच्या भागात लाद्या बसवण्याचे काम केलेले आहे. काम केल्यानंतर फंडातुन काम केल्याचा इलेक्ट्रीक फलक इमारतीच्या वर दर्शनी भागात लावण्याची काहीच गरज नव्हती. आज रोज संध्याकाळी ६ वाजता लाईक सुरू केली जाते ती सकाळी ६ वाजेपर्यत चालु असते. हा लाईटीचा भुर्दड सोसायटीला भरावा लागत आहे. लोकप्रतिनिधींनी आपला फंड विचारपूर्वक वापरावा.

- **अनंत दत्ताराम दाभोळकर, साईवाडी, अंधेरी**

मराठी अस्मितेचा बुलंद आवाज.
https://www.vruttamanas.in/
# वृत्तमानस
आर. एन. आय क्र. - ६५६०९/९६ | किंमत : ३ रुपये
मुंबई/ पालघर | मुंबई, शनिवार, ५ ऑक्टोबर २०२४ | वर्ष- २९ | अंक - १०५ | पाने- ८

## आदिवासी आमदारांचे अनोखे आंदोलन, मंत्रालयात मारल्या उड्या

**मुंबई** : धनगर समाजाला अनुसूचित जमातीचे (एसटी) आरक्षण देण्याच्या निर्णयाविरोधात सत्ताधारी महायुतीचे आदिवासी आमदार आज चांगलेच आक्रमक झाले. विधानसभेचे उपाध्यक्ष नरहरी झिरवळ यांनी शुक्रवारी थेट मंत्रालयाच्या तिसऱ्या मजल्यावरून उडी मारली. त्यांच्यासोबत आमदार हिरामण खोसकर यांनीही उडी मारली. पण हे दोघेही मंत्रालयाच्या संरक्षक जाळीवर पडल्याने बचावले. या आमदारांच्या आंदोलनामुळे काहीवेळ अवघे मंत्रालयच स्तब्ध झाले होते.

धनगर समाजाने आरक्षणाच्या मागणीवर महायुती सरकारने सकारात्मक प्रतिसाद दिला आहे. त्याला आमदार नरहरी झिरवळ, हिरामण खोसकर, किरण लहामटे, सुनील भुसारा आणि खासदार हेमंत सावरा या लोकप्रतिनिधींनी विरोध केला आहे. या प्रकरणी झिरवळ व त्यांच्या सहकाऱ्यांनी शुक्रवारी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेतली. पण ही भेट निष्फळ ठरल्यामुळे निषेध म्हणून त्यांनी टोकाचा निर्णय घेत थेट मंत्रालयाच्या तिसऱ्या मजल्यावरून उडया मारल्या.

## छत्तीसगडमध्ये 30 नक्षल्यांचा खात्मा
### दंतेवाडा-नारायणपूर सीमेवर चकमक



**वृत्तसंस्था**
**दंतेवाडा**

छत्तीसगडमध्ये आज झालेल्या मोठ्या चकमकीत 30 नक्षलवादी ठार झाल्याचे समजते. शुक्रवारी दंतेवाडा-नारायणपूर जिल्ह्याच्या सीमेवर पोलिस आणि नक्षलवाद्यांमध्ये चकमक झाली. शोध मोहिमेत 14 नक्षलवाद्यांचे मृतदेह सापडले आहेत. एके-47, एसएलआरसह इतर शस्त्रेही जप्त करण्यात आली आहेत.

ओरछा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील नेंदूर आणि थुलाथुली गावांदरम्यानच्या जंगलात ही चकमक झाली. या काळात मृतदेह आणि स्वयंचलित शस्त्रे जप्त करण्यात आली. एक दिवस आधी नारायणपूर आणि दंतेवाडा जिल्ह्यातील सैनिकांना नक्षलविरोधी मोहिमेवर पाठवण्यात आले होते.

शुक्रवारी जंगलात 2 तास अधूनमधून गोळीबार सुरू होता. यानंतर गोळीबार थांबल्यानंतर शोध मोहीम हाती घेण्यात आली. संध्याकाळी 6 वाजेपर्यंत जवानांनी 14 नक्षलवाद्यांच्या मृतदेहांसह मोठ्या प्रमाणात साहित्य जप्त केले आहे. मात्र, ठार झालेल्या नक्षलवाद्यांची संख्या 30 असल्याचे सांगण्यात येत आहे.

मुख्यमंत्री विष्णुदेव साईही आज दंतेवाडा दौऱ्यावर होते. येथे शुक्रवारी त्यांनी विधानसभा अध्यक्ष डॉ. रमण सिंह यांच्यासमवेत 167 कोटी रुपयांच्या विकासकामांचे उद्घाटन करून भूमिपूजन केले. येथे सुकमा जिल्ह्यात झालेल्या चकमकीनंतर मोठ्या प्रमाणात नक्षलवादी साहित्य जप्त करण्यात आले. आज 10 दिवसांत दुसऱ्यांदा येथे चकमक झाली.










# कोणी संविधान बदलणार असेल तर याद राखा कोथळा काढू - केंद्रीय राज्यमंत्री आठवले

**प्रतिनिधी**

■ **सातारा**

रिपब्लिकन पक्ष छोटा पक्ष असला तरी मोठ्या पक्षांना सत्ता मिळवून देण्यात मोठी मदत करणारा पक्ष आहे.या पक्षाला वाढवायचे आहे. आताच्या विधानसभा निवडणुकीतही मिळतील त्या जागांवर लढणार आहोत. त्यामुळे कार्यकर्त्यांनी कामाला लागुन महायुतीचे सरकार आणावे, असे आवाहन रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना. रामदास आठवले यांनी केले. त्याचबराबर देशाचे संविधान कोणीही बदलू शकत नाही मात्र बदल आणि आरक्षण हटविण्याचा कोण विचार करणार असेल तर याद राखा, उद्या मरायचे ते आज मरु. वाघ नखे मला मिळाली तर संविधान बदलण्याचा विचार करणाऱ्यांचा कोथळा काढू असा इशाराही ना. रामदास आठवले यांनी दिला.



